# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.07.2025** **वार- बुधवार**

---

**जाजू**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला म्हणजेच एफटीआयआय ला भेट दिली. त्यांनी संस्थेतील सर्व विभागांमध्ये जाऊन त्यांनी कामकाज तसंच प्रशिक्षणाची माहिती घेतली. उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांसोबत त्यांनी संवादही साधला. त्यांनी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या परिसराला देखील भेट दिली. यावेळी संचालक धीरज सिंग, एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम, केंद्रीय संचार ब्युरोचे उपसंचालक आणि प्रमुख निखील देशमुख, तसंच आकाशवाणी पुणे वृत्त विभागाचे प्रमुख, सहायक संचालक माधव जायभाये उपस्थित होते.

**याचिका**

पुणे शहरातून वाहणाऱ्या मुठा नदीच्या पूररेषेचा पुनर्विचार करावा. तसंच, पूररेषेपासून 100 मीटर अंतरापर्यंत बांधकाम करण्यास मज्जाव करण्याबाबत स्वयंसेवी संस्थांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका न्यायालयाने निकाली काढली. पूररेषेबाबत यापूर्वी नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीनं दोन महिन्यांत अहवाल द्यावा. या अहवालाचं अवलोकन करून राज्य सरकारनं दोन महिन्यांच्या आत योग्य ती कार्यवाही करावी, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. पुणे महापालिकेच्या 2017 च्या मंजूर केलेल्या विकास आराखड्यात शहरातील नद्यांच्या पूररेषा चुकीच्या पद्धतीनं दाखविण्यात आल्याचा आरोप करून यामध्ये बदल करण्यासाठी पर्यावरणप्रेमी सारंग यादवाडकर, सजग नागरिक मंचचे विवेक वेलणकर, सुराज्य संघर्ष समितीचे विजय कुंभार यांनी ही याचिका दाखल केली होती.

**हिरवे**

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' आणि 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये 5 लाखांचा टप्पा-गाठला आहे. या योजनेत आत्तापर्यंत सहभागी झालेल्या 5 लाख 3 हजार 795 वीजग्राहकांना 6 कोटी 4 लाख 55 हजार रुपयांचा वार्षिक लाभ होत आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत 522 कोटी रुपयांची करवसुली करून नवा विक्रम केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी केलेल्या 10 कर्मचारी आणि तीन विभागीय कार्यालयांना प्रशस्तीपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवडमहापालिकेच्या वतीनं शाश्वत शहरी गतिशीलता या विषयावर आयोजित तीन दिवसीय परिषद आणि प्रशिक्षण सत्राचं उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज झालं. यावेळी महापालिकेच्या विविध प्रकल्पांची माहिती सादरीकरणाद्वारे उपस्थितांना देण्यात आली.

**<u>नवीन बस</u>**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजे पुणे विभागाकडून बसगाड्यांचं फेरनियोजन केलं जाणार असून, कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांवरील सेवा बंद केली जाणार आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडण्यात येणार असून, जुन्या बस सेवेतून काढून येत्या वर्षअखेरपर्यंत 150 नवीन बस ताफ्यात दाखल होणार आहेत असं एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**<u>बस</u>**

आषाढी वारीला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटीच्या पुणे विभागाकडून पाचशेहून अधिक अतिरिक्त गाड्यांचं नियोजन केलं आहे. आजपासून स्वारगेट आगारातून अतिरिक्त गाड्या सोडण्यात येणार असून, भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असं आवाहन एसटी प्रशासनानं केलं आहे.

**<u>डॉक्टर</u>**

पोलीस आणि डॉक्टर्स दोन्ही घटकांचा योग्य सन्मान राखला, त्यांना प्रोत्साहन मिळालं, तर समाजाचं आरोग्य अधिक सुदृढ होईल असं मत माजी पोलीस सहायक आयुक्त भानुप्रताप बर्गे यांनी पुण्यात व्यक्त केलं. जागतिक डॉक्टर्स दिनानिमित्त रुग्ण हक्क परिषदेच्या वतीनं कर्तृत्ववान डॉक्टरांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. रुग्ण हक्क परिषदेनं नेहमीच समाज आणि डॉक्टरांमधील नातेसंबंध दृढ करण्याला प्राधान्य दिल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<u>कारवाई</u>**

पुण्यात कँप परिसरात एका ठिकाणी बांधकाम सुरु असताना अपघात होऊन एका बांधकाम मजूराचा मृत्यू झाला आणि इतर मजूर गंभीर जखमी झाले. या संदर्भात संबंधित व्यक्तींवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा आणि कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस पुणेचे अध्यक्ष चेतन आगरवाल यांनी केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**